MHCO260001982025

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : ०२.०७.२०२५ |
| नोंदणी तारीख | : ०२.०७.२०२५ |
| निकाल तारीख | : १०.०७.२०२६ |
| कालावधी | : वर्ष म. दि.<br>०१ ०० १४ |

# कोर्ट विद्यमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड

( श्री बी.एस.लखोटे न्यायाधीश यांचे समोर )

**दावा क्रमांक सी.सी.पी. १९४/२०२५**

शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित परभणी, ता. जि. परभणी
मार्फत प्राधिकृत अधिकारी
नासेर अहमद खान एम.डी. सारवार खान
वयः ५२ वर्ष, धंदाः नोकरी
रा. परभणी ता. जि. परभणी .......**वादी**

—**विरुध्द**—

१. दिलीप पूनाजी साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
खरडाडी ता. जिंतूर जि. परभणी

२. तूकाराम ज्ञानोबा साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद प्राथमिक मूलींची शाळा
चारठाणा ता. जिंतूर जि. परभणी

३. किशन कडूजी साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा
केहळ ता. जिंतूर जि. परभणी

४. मूख्याध्यापक ( आहरण व संवितरण अधिकारी )

रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
खरडाडी ता. जिंतूर जि. परभणी

५. गटशिक्षण अधिकारी, ( आहरण व संवितरण अधिकारी )
रा. पंचायत समिती, जिंतूर ता. जिंतूर जि. परभणी .......**प्रतिवादी**

**विवाद —रक्कम रू. १४,४१,४४६/—वसूलीकरिता**

वादीतर्फे विधीज्ञ : श्री.बी.व्ही.पवार
प्रतिवादी क्र.१ ते ५: एकतर्फी

**न्या य नि र्ण य**

( घोषीत निकाल दिनांक १६ जूलै २०२६ )

**वादीची केस थोडक्यात खालीलप्रमाणे**

१. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत पंजीकृत असून प्रतिवादी १ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी नं. २ आणि ३ हे प्रतिवादी नं.१ करिता जामिनदार असून प्रतिवादी नं. ४ व ५ हे प्रतिवादी नं. १ ते ३ चे आहंरण व संवितरण अधिकारी आहेत.

२. प्रतिवादी नं १ यांनी वादी संस्थेकडे कर्ज मिळण्याकरिता दिनांक १८/०५/२०२२ रोजी रू. १०,००,०००/— करिता अर्ज केला होता. त्यानूसार संस्थेने प्रतिवादी नं.१ यांना कर्ज रूपये १०,००,०००/— मंजूर केले. कर्जाचा व्याजदर १५.५० टक्के ठरला होता. कर्जाची परतफेड वेळेत न केलयास ३ टक्के दंडव्याज आकारण्यास मान्यत दिली होती. कर्ज हप्ते परतफेड प्रतिवादी नं.१ च्या मासिक पगारातून करण्याचे ठरले होते.

३. प्रतिवादी नं. ४ आणि ५ यांनी प्रतिवादी नं. १ च्या पगारातून कर्ज हप्ते कपात करण्याचे प्रमाणपत्र दिले होते. प्रतिवादीने वादीच्या हक्कात कर्जाचे कागदपत्रे करून दिले. त्यानंतर संस्थेने प्रतिवादी नं. १ यांना कर्ज रक्कम रू. १०,००,०००/—चेकद्वारे वितरीत केले आणि प्रतिवादी नं.

१ यांनी रक्कम मिळालयाची पावती वादीला दिली.

४. प्रतिवादी नं. १ यांनी सदर रकमेचा उपयोग केल्या नंतर त्यांनी मासिक पगारातून कर्ज हप्त्याची परतफेड केली नाही. तसेच प्रतिवादी नं. ४ व ५ यांनी सूध्दा प्रतिवादी नं.१ च्या मासिक पगारातून कर्ज हप्ते कपात केली नाही आणि त्यांनी अटी व शर्तीचा भंग केला

५. संस्थेने प्रतिवादी न. १ च्या कर्जाचा खातेउतारा ठेवला असून प्रतिवादी १ कडे दि.३१/०३/२०२५ अखेर रूपये १४,४१,४४६/—बाकी आहेत आणि त्याकरिता प्रतिवादी हे व्यक्तीगत व सामूहिकरित्या जबाबदार आहेत.

६. संस्थेने प्रतिवादींना दि.२४/१२/२०२४ रोजी कर्ज रकमेची मागणी नोटीस प्रतिवादींना दिले. परंतू प्रतिवादीने कर्जाची परतफेड केली नाही. तसेच वादीच्या नोटीसला उत्तर दिले नाही. करिता वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरूध्द वर नमूद रकम वसूलीकरिता दाखल केला आहे.

७. प्रतिवादींना दाव्यातील समन्स मिळाले परंतू ते हजर झाले नाहीत त्यामूळे त्यांच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

वादीच्या कथनावरून खालील मूद्दे उपस्थित होतात. आणि माझा निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १.प्रतिवादी हे व्यक्तिगत व सामूहिकरित्या रक्कम रूपये १४,४१,४४६/—द.सा.द.शे. १५.५० टक्के ३ टक्के दंडव्याजासह दि. ०१/०४/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत परतफेड | |

करण्यात जबाबदार असल्याचे वादी सिध्द करू
शकते काय? होकारार्थी

२.आदेश आणि हूकुमनामा काय? अंतिम आदेशाप्रमाणे

**कारणमिमांसा**

८.**मुद्दा कमांक १ व २ :** वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरूध्द कर्ज रक्कम वसूलीकरितादाखल केला असून वादीच्या कथनाप्रमाणे संस्थेने प्रतिवादी नं. १ यांना रक्कम रूपये १०,००,०००/— कर्ज मंजूर केले आणि त्याकरिता प्रतिवादी नं. २ व ३ जामिनदार असून प्रतिवादी न. ४ व ५ हे प्रतिवादी १ चे अहंरण व संवितरण अधिकारी आहे प्रतिवादीने कर्जाची परफेड केली नाही.

९. वादीने दाव्यातील कथन सिध्द करण्याकरिता संस्थेतर्फे अधिकृत साक्षीदार म्हणून नासेर अहमद खान सरवार खान यांच्या शपथपत्रावर नि. १८ कडे दाखल केले असून साक्षीदाराने त्यांच्या शपथपत्रात दाव्यातील नमूद बाबीचा उल्लेख केला आहे तसेच कागदपत्राचा सूध्दा उल्लेख केला आहे साक्षीदाराच्या पुराव्यानूसार प्रतिवादी १ यांना कर्जाचे वितरण केले होते आणि त्याकरिता प्रतिवादी २ व ३ जामिनदार आहेत.

१०. वादी साक्षीदाराच्या समर्थ संस्थेने ठराव, कर्जमागणी अर्ज, जामिनदाराचा अधिकारपत्र, करारनामा, वचनचिठी, पावती, जामिनपत्र, शाळेच्या मूख्याध्यापकाचे शिफारसपत्र, करारनामा, हमीपत्र, संमत्तीपत्र, प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे पगारपत्रक, प्रतिवादी नं. ४ व ५ यांचे शिफारसपत्र, नोटीस, खातेउतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केले असून कागदपत्राचे अवलोकन केले असता दिसून येते की त्यावर प्रतिवादींच्या

सह्या आहेत. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी वादीच्या दाव्याला लेखी उत्तर दाखल केले नाही वर नमूद कागदपत्रावरून स्पष्ट होते की प्रतिवादी नं. १ यांनी संस्थेकडून रूपये १०,००,०००/— कर्ज घेतले आणि त्याकरिता प्रतिवादी न. २ व ३ जामिनदार आहेत.

११. वादी संस्थेने प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे अहंरण व संवितरण अधिकारी म्हणून प्रतिवादी नं. ४ व ५ यांना दाव्यात पक्षकार केले वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी न. ४ व ५ यांनी प्रतिवादी नं. १ यांना कर्ज देण्याकरिता शिफारस केली. त्यांनी कलम ४९ (१) व (२) अन्वये प्रमाणपत्र दिले. सदरचे प्रमाणपत्र दाखल असून प्रतिवादी नं. ४ व ५ यांनी प्रतिवादी नं. १ च्या मासिक पगारातून कर्जहप्ते कपात करण्याची जबाबदारी स्विकारली. त्यामूळे प्रतिवादी नं.१ मासिक पगारातून कर्जहप्ते कपात करण्याची त्यांची जबाबदारी आहे.

१२. वादी संस्थेच्या म्हणनेप्रमाणे प्रतिवादी कडे दि. ३१/०३/२०२५ अखेर रूपये १४,४१,४४६/—बाकी आहे. ही रक्कम सिध्द करण्याकरिता संस्थेने निशाणी २० कडे खातेउतारा दाखल केला. खातेउता—याचे निरीक्षण केले असता दिसून येते की संस्थेने प्रतिवादी नं. १ यांना दि. ०८/०६/२०२२ रोजी रूपये १०,००,०००/—वितरीत केले. संस्थेने खातेउता—यामध्ये दि.३१/०३/२०२५ अखेर मूद्दल रक्कम रूपये १०,१४,४४०/— आणि व्याज रक्कम रूपये ४,२७,००६/—एकूण १४,४१,४४६/—बाकी दाखवले. संस्थेने खातेउता—यात घेतलेल्या नोंदी बरोबर असून प्रतिवादी कडे रक्कम रूपये १४,४१,४४६/— बाकी असल्याचे सिध्द होत आहे.

१३. संस्थेने सदरचे कर्ज १५.५० टक्के आणि ३ टक्के दंडव्याज दराने वसूल करून मागितले संस्थेने व्याजदर सिध्द करण्याकरिता वर नमूद कागदपत्रे दाखल केले. करारनामा, वचनचिठी, हमीपत्र, या कागदपत्रावरून दिसून येते की यामध्ये १५.५० टक्के व्याजदाराचा उल्लेख आहे. तसेच करारनामामध्ये कर्जहप्ता थकल्यास पोटनियमाप्रमाणे ३ टक्के दंडव्याज आकारण्यात यावे असा उल्लेख आहे. परंतू पोटनियमाची प्रत दाखल केली नाही त्यामूळे वादी संस्था ३ टक्के दंडव्याजाकरिता हक्कदार आहे. प्रतिवादी १ ते ३ यांनी या सर्व कागदपत्रांना आव्हान दिले नाही.

करिता ही बाब सिध्द होत आहे की वादीने दावा सिध्द केला असून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी व्यक्तीगत व सामूहिकरित्या रक्कम रूपये १४,४१,४४६/— द.सा.द.शे. १५.५० टक्के सरळव्याज आणि ३ टक्के दंडव्याजासहित दिनांक ०१/०४/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम परतफेड होईपर्यंत वादीला द्यावे.

३. प्रतिवादी क्रमांक ४ व ५ यांनी प्रतिवादी नं.१ च्या मासिक पगारातून कर्जहप्ते कपात करून संस्थेकडे वर्ग करावे.

४. आदेशाप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

Digitally signed by BHASKAR SHANKARRAO LAKHOTE
Date: 2026.07.16 17:29:37 +0530

ठिकाण : नांदेड

दिनांक : १६/०७/२०२६

( बी.एस.लखोटे )
न्यायाधीश
सहकार न्यायालय,नांदेड.

# **कोर्ट विद्यमान न्यायाधिश, सहकार न्यायालय, नांदेड**

( श्री बी.एस.लखोटे न्यायाधीश यांचे समोर )

**दावा क्रमांक सी.सी.पी. १९४/२०२५**

शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित परभणी, ता. जि. परभणी
मार्फत प्राधिकृत अधिकारी
नासेर अहमद खान एम.डी. सारवार खान
वय: ५२ वर्ष, धंदा: नोकरी
रा. परभणी ता. जि. परभणी .......**वादी**

—**विरुध्द**—

१. दिलीप पूनाजी साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
खरडाडी ता. जिंतूर जि. परभणी

२. तूकाराम ज्ञानोबा साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद प्राथमिक मूलींची शाळा
चारठाणा ता. जिंतूर जि. परभणी

३. किशन कडूजी साबळे
वय : सज्ञान धंदा : नोकरी
रा. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा
केहळ ता. जिंतूर जि. परभणी

४. मूख्याध्यापक ( आहरण व संवितरण अधिकारी )
रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
खरडाडी ता. जिंतूर जि. परभणी

५. गटशिक्षण अधिकारी, ( आहरण व संवितरण अधिकारी )
रा. पंचायत समिती, जिंतूर ता. जिंतूर जि. परभणी .......**प्रतिवादी**

**विवाद —रक्कम रू. १४,४१,४४६/—वसूलीकरिता**

ज्या अर्थी १९६१ चा कायदा २४ चे कलम ९१ अन्वये वादी व

प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन निकाल करण्याचे आहे.

त्याअर्थी मी, बी.एस.लखोटे न्यायाधीश सहकार न्यायालय नांदेड वरील पक्षकारास समन्स करुन दाव्याची योग्य चौकशी अलहिदा नोंदवून ठेवलेल्या कारणावरुन निवाडा करण्यात येत आहे.

**निवाडा**

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी व्यक्तीगत व सामूहिकरित्या रक्कम रूपये १४,४१,४४६/— द.सा.द.शे. १५.५० टक्के सरळव्याज आणि ३ टक्के दंडव्याजासहित दिनांक ०१/०४/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम परतफेड होईपर्यंत वादीला द्यावे.

३. प्रतिवादी क्रमांक ४ व ५ यांनी प्रतिवादी नं.१ च्या मासिक पगारातून कर्जहप्ते कपात करून संस्थेकडे वर्ग करावे.

४. कोर्ट फि खर्च :— १०,७१०/—

Digitally signed by
BHASKAR SHANKARRAO
LAKHOTE
Date: 2026.07.16
17:29:43 +0530

स्थळ :— नांदेड.
दिनांक :— १६/०७/२०२६

( बी.एस.लखोटे )
न्यायाधीश
सहकार न्यायालय,नांदेड.